दै. पुढारी दि. 06-03-2023



# दरोड्याच्या तयारीत असलेल्या दोन महामार्ग लुटारूंना अटक

## तलवार, लोखंडी रॉड सोनखेड पोलिसांकडून जप्त

**अटक केलेल्यापैकी यश कौशीक हा १९ वर्षांचा असून तो ऑटोचालक आहे,पोलिसांनी जप्त केलेला ऑटो यशचाच असल्याचे समजते तर रोशन पद्मावार हा मिस्त्रीकाम करतो. रोहित कदम याच्याविरुद्ध अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद असून तो घटनास्थळावरून फरार झाला आहे. इतरांविरुद्ध चोरीसारखे किरकोळ गुन्हे दाखल आहेत. फरार दरोडेखोर देखील लवकरच अटक केली जाईल, असा विश्वास विशाल भोसले यांनी व्यक्त केला.**

**नांदेड, पुढारी वृत्तसेवा :** राष्ट्रीय महामार्गावरील दुचाकी आणि चारचाकी वाहनांना अडवून त्यांना लुटण्याच्या तयारीत असलेल्या दोन दरोडेखोरांना सोनखेड पोलिसांनी अटक केली आहे. या दरोडेखोरांकडून पोलिसांनी तलवार, लोखंडी रॉड या घातक शस्त्रासह दोरी आणि ऑटो जप्त केला आहे. या कामगिरीबद्दल वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी ठाणेदार विशाल भोसले आणि त्यांच्या टीमचे कौतुक केले आहे.

विशाल भोसले यांनी सोनखेड ठाण्याची सूत्रे स्वीकारल्यापासून अनेक गंभीर गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळविले आहे. काही दिवसांपूर्वी रातोळी येथील पुलावरुन चोरट्यांनी एक भले मोठे कंटेनर पळविले होते. कंटेनर चालकला मारहाण करून तसेच त्याचे दोन्ही हात आणि पाय बांधून त्याला मुखेड तालुक्यातील शिकारा या गावात नेऊन फेकले होते. हा कंटेनर भोसले आणि त्यांच्या टीमने सिनेस्टाईल पकडला होता तसेच एका चोरट्यालाही अटक केली होती.



रोहित पद्मावार



यश कौशिक

शनिवार, दि.४ मार्च रोजी पहाटे ३ वाजता भोसले आपले सहकारी मधुकर मोरे, नागरगोजे आणि सुनील मोरे यांच्यासह रात्र गस्तीवर असताना त्यांना राष्ट्रीय महामार्गावर काही दरोडेखोर वाहनधारकांना लूटण्यासाठी दबा धरुन बसल्याची माहिती मिळाली होती.

त्यांनतर भोसले यांनी ही माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे आणि पोलिस उपअधीक्षक डॉ.सिद्धेश्वर भोरे यांना दिल्यानंतर त्यांच्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार दरोडेखोरांना पकडण्यासाठी सापळा होता. महामार्गावरील निसर्ग धाब्याच्या पाठीमागे दबा धरून बसलेल्या यश कौशिक, रोशन पद्मवार या दोघांना पोलिसांनी अटक केली असून रोहित कदम, संतोष कंधारे आणि अन्य एक असे तिघे फरार झाले आहेत. न्यायालयाने या दोघांनाही तीन दिवसाच्या पोलिस कोठडीत पाठवले आहे.